**महाराष्ट्र शासन**
**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय**
कामगार भवन- ५ वा मजला, ई-ब्लॉक, सी-२०, रिझर्व्ह बँकेच्या समोर, वांद्रे -कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ दुरध्वनी क्र.२६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४,
ईमेल: dirdish.mum-mh@gov.in website : www.mahadish.in

माहितीचा अधिकार

क्र. संऔसुवआ/सूट/ ५५६० /१,
दिनांक :- 9 AUG 2021

परिपत्रक क्र. : 29/२०२१.

विषय : **कारखान्यातील दाब यंत्रे, उचलयंत्रे आणि सॉल्वंट एक्स्ट्रॅक्शन प्लांट इत्यादींचे तपासणी अहवाल प्रमाणित करण्याकरीता e-sign / digital signature certificate चा वापर करण्याबाबत.**

कारखान्यातील दाब यंत्रे, उचल यंत्रे आणि सॉल्वंट एक्स्ट्रॅक्शन प्लांट इत्यादींचे तपासणी अहवाल यांचे लॉग बुक ऑनलाईन सादर करण्याकरीता संचालनालयाने प्रणाली विकसित केली आहे. कारखान्यातील संयंत्राच्या तपासणीबाबतचे सर्व कामकाज या प्रणालीमार्फत करण्याबाबतच्या सुचना सर्व मान्यताप्राप्त सक्षम व्यक्तींना देण्यात आलेल्या आहेत .

तरी सर्व सक्षम व्यक्तीना सूचित करण्यात येते कि त्यांनी केलेल्या तपासणींच्या अहवालांच्या ईलेक्ट्रोनिक्स प्रती PDF स्वरूपात माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मध्ये नमूद e-sign / डिजिटल हस्ताक्षर चा वापर करून प्रमाणित करण्यात यावे आणि संबंधित कारखान्यांना इलेक्ट्रोनिक्स स्वरूपातच पाठविण्यात यावे . त्यामुळे कागदांची मोठया प्रमाणात बचत होणार आहे.

तसेच सर्व कारखान्यांचे भोगवटादार/व्यवस्थापक यांना सूचित करण्यात येते कि, सक्षम व्यक्ती यांनी e-sign / digital signature certificate चा वापर करून प्रमाणित केलेले नमुना ११, १३ आणि सॉल्वंट एक्स्ट्रॅक्शन प्लांट तपासणी अहवाल निरीक्षणाच्या वेळी सादर करावे. तसेच सदर अहवालांची सक्षम व्यक्तींकडे hard copy करीता मागणी करण्यात येऊ नये.

(सु.प्र. राठोड)
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीकरीता सादर,
१) सर्व अपर / सह संचालक / उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य.
२) सर्व मान्यताप्राप्त सक्षम व्यक्ती.
३) महाराष्ट्रातील सर्व नोंदणीकृत कारखाने.
४) शाखा क्र. ८.